लोकमत

रविवार, दि. ३० मार्च २००८ ३

# डॉ. हृषीकेश पै यांची 'मुंबई गायनॉकॉलॉजिकल सोसायटी'च्या अध्यक्षपदी निवड

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) -** 'गायनॉकॉलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेशी संलग्न असलेल्या 'मुंबई गायनॉकॉलॉजिकल सोसायटी'चे ५५वे अध्यक्ष म्हणून डॉ. हृषीकेश पै (एमडी एफसीपीएस एमएससी) यांची निवड झाली.

मुंबईत एका शानदार समारंभात डॉ. पै यांना अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा करण्यात आली. या वेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अनिल देशमुख, अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री बाबा सिद्दिकी, चित्रपट अभिनेत्री पूनम धिल्लो, पद्मिनी कोल्हापुरे, किरण जोनेजा, चित्रकार सुभाष अवचट, चित्रपट निर्माते रमेश सिप्पी, अशोक ठकेरीया, आदी उपस्थित होते.

डॉ. पै गेल्या १७ वर्षांपासून (आयव्हीएफ) क्षेत्राशी संबंधित असून ते मुंबईतील लीलावती रुग्णालय आणि दिल्लीतील फोर्टीस ला फेम्मी रुग्णालयात प्रॅक्टीस करतात. इन्फर्टिलिटी क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याबद्दल डॉ. पै यांना सप्टेंबर २००२ मध्ये राजीव गांधी राष्ट्रीय एकता पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे तसेच इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने जुलै २००४ मध्ये डॉ.पै यांना बेस्ट डॉक्टर्स या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.